Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक १०]     गुरुवार ते बुधवार, मार्च ११-१७, २०२१/फाल्गुन २०-२६, शके १९४२     [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-अ–नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४३.

**प्रशासक, नगर पंचायत, यांजकडून**

**कोरची नगरपंचायत क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ (१) [ कलम २१(२) सह ] अन्वये विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणे.**

क्रमांक नपको-८७–२०२१.—

शासनाचे नगर विकास विभागाची अधिसूचना क्रमांक एमयुएन-२०१४-प्र. क्र.९७-भाग-१-नवि-१८, दिनांक २३-०४-२०१५ अन्वये कोरची नगरपंचायत नव्याने अस्तित्वात आलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) अन्वये नगरपंचायत क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास होण्यासाठी विकास योजना तयार करणे आवश्यक आहे.

सबब महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(१) [ कलम २१(२) सह ] नुसार कोरची नगरपंचायत क्षेत्राकरीता भौगोलिक माहिती प्रणालीच्या (GIS) आधारे विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी सदर ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(२) नुसार नगरपंचायतीच्या विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राचा फक्त हद्द दर्शविणारा व मुख्याधिकारी यांनी स्वाक्षांकित केलेला नकाशा, कोरची नगरपंचायतीच्या कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात यावा.

विकास योजना तयार करण्याचा नगरपंचायतीचा इरादा, महाराष्ट्र शासन राजपत्रात व स्थानिक मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात सूचनेद्वारे प्रसिद्ध करण्यात यावा. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून ६० दिवसांच्या कालावधीत प्राप्त होणा-या नागरिकांच्या सूचना/ हरकतींचा विचार, विकास योजना तयार करतांना करण्यात यावा.

**डॉ. कुलभूषण रामटेके,**
प्रशासक,
कोरची नगर पंचायत, कोरची.

कोरची :
दिनांक १ मार्च २०२१.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४४.

BY ADMINISTRATOR, NAGAR PANCHAYAT

**Declaration of Intention to prepare Development Plan of Korchi Nagar Panchayat u/s 23(*1*) [read with Section 21(*2*)] of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

No. NPK-87-2021.—

Government of Maharashtra in Urban Development Department *vide* its Notification No. MUN-2014/ C.R.102/PART-1/D-18, dated 23rd April 2015 constituted Korchi Nagar Panchayat. It is necessary to prepare the Development Plan for the area of Nagar Panchayat as per Section 21 *(2)* of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for planned Development of the said area.

Hence, the Korchi Nagar Panchayat by its Resolution No. 06, dated 23-2-2021 has given consent to declare its intention to prepare Development Plan, as per provision of Section 23 *(1)* [read with Section 21 *(2)* ] of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly, this notice is being published.

The plan showing boundary of the area included in Development Plan of Korchi Nagar Panchayat is kept open for inspection by the public on office working days, during office hours at the office of the Korchi Nagar Panchayat, as required under Section 23*(2)* of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.

Any suggestion / objection of the public in this regard, may be forwarded in writing to the Chief Officer, Korchi Nagar Panchayat within a period of 60 (Sixty) days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette.* The suggestion / objection shall be duly considered while preparing the Development Plan.

Korchi :
Dated the 1st March 2021.

Dr. KULBHUSHAN RAMTEKE,
Administrator,
Korchi Nagar Panchayat, Korchi.

———————

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४५.

**मुख्याधिकारी, नगर पंचायत, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ (१) कलम २१(२) सह नुसार एटापल्ली नगरपंचायत क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत**

क्रमांक कली-नपए-१५–२०२१.—

शासनाने नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एमयुएन-२०१४-प्र. क्र.१०२-भाग-१-नवि-१८, दिनांक २३-०४-२०१५ अन्वये एटापल्ली नगर पंचायत स्थापन केलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) अन्वये एटापल्ली नगरपंचायत क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास होण्यासाठी त्या क्षेत्राची विकास योजना तयार करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(१) [कलम २१(२) सह] नुसार एटापल्ली नगरपंचायतीच्या विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी स्थायी/प्रशासकीय सभेचा ठराव क्रमांक ०६, दिनांक ११ फेब्रुवारी २०२१ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची सुचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(२) नुसार एटापल्ली नगर पंचायतीच्या विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राचा फक्त हद्द दर्शविणारा नकाशा एटापल्ली नगर पंचायतीच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरिकांच्या याबाबत काही सूचना/हरकती असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत मुख्याधिकारी, नगर पंचायत, एटापल्ली यांचेकडे लेखी स्वरुपात द्याव्यात. विकास योजना तयार करतांना त्या सूचना/हरकतीचा योग्य तो विचार करण्यात येईल.

**मनुज जिंदल,**
मुख्याधिकारी (भाप्रसे),
नगर पंचायत, एटापल्ली.

एटापल्ली :
दिनांक २४ फेब्रुवारी २०२१.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४६.

BY CHIEF OFFICER, NAGAR PANCHAYAT

**Declaration of Intention to prepare Development Plan of Etapalli Nagar Panchayat u/s 23(*1*) [read with Section 21(*2*)] of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

No. WS-ENP-15-2021.—

Government of Maharashtra in Urban Development Department *vide* its Notification No. MUN-2014/ C.R.102/PART-1/D-18, dated 23rd April 2015 constituted Etapalli, Nagar Panchayat. It is necessary to prepare the Development Plan for the area of Nagar Panchayat as per Section 21 *(2)* of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for planned Development of the said area.

Hence, the Etapalli Nagar Panchayat by its Resolution No. 06, dated 11th February 2021 has given consent to declare its intention to prepare Development Plan, as per provision of Section 23 *(1)* [read with Section 21 *(2)* ] of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly, this notice is being published.

The plan showing boundary of the area included in Development Plan of Etapalli Nagar Panchayat is kept open for inspection by the public on office working days, during office hours at the office of the Etapalli Nagar Panchayat, as required under Section 23*(2)* of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.

Any suggestion / objection of the public in this regard, may be forwarded in writing to the Chief Officer, Etapalli Nagar Panchayat within a period of 60 (Sixty) days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette.* The suggestion / objection shall be duly considered while preparing the Development Plan.

MANUJ JINDAL (I.A.S.),
Chief Officer,
Etapalli Nagar Panchayat.

Etapalli :
Dated the 24th February 2021.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.